" स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद " - कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे ,

# सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, विद्यानगर, कराड

पिन - ४१५ १२४ जि. सातारा (महाराष्ट्र) पो.ऑ.बॉ.नं. ३
कला, विज्ञान व वाणिज्य (कनिष्ठ व वरिष्ठ) नॅक मानांकन : B+
(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित)
संस्थापक : पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डी.लिट्.

स्थापना : १९५४

प्राचार्य
डॉ. एम. एम. राजमाने
एम.एस्सी.,पीएच.डी.

कार्यालय : (०२१६४) २७१३४६
निवास : (०२१६४) २७१७९४
ई मेल :str.sgmck-@Sancharnet.in

संदर्भ क्र. :
दिनांक : 8/5/09

## ॥ प्रमाणपत्र ॥

प्रमाणित करण्यात येते की, कु. यादव रूपाली प्रकाश या कॉलेजच्या २००७ -०८ या वर्षात एम. फिल्. (मराठी) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित विद्यार्थिनी होत्या. त्यांनी " गणेश चौधरी यांचे 'नागवा' व 'काचेचं मन' या साहित्यकृतींचे चिकित्सक अध्ययन " या टॉपिक (विषय) वर डॉ. रवींद्र भास्करराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंधिका पूर्ण केली आहे. तरी त्यांची प्रबंधिका एम. फिल्. परीक्षेसाठी स्वीकारण्यात यावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

प्रमुख,
मराठी पदव्युत्तर अध्यापन व संशोधन केंद्र
सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

प्राचार्य,
सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज,
कराड

स्थळ : कराड.
दिनांक : ०४ मे २००९.

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. रुपाली प्रकाशराव यादव यांनी ''गणेश चौधरी यांचे 'नागवा' व 'काचेचं मन' या साहित्यकृतींचे चिकित्सक अध्ययन'' या विषयावरील प्रस्तुत प्रबंधिका एम्. फिल्. (मराठी) या पदवीसाठी माझ्या मार्गदर्शनाखाली सिद्ध केली आहे.

त्यांनी उपलब्ध साहित्याचा अभ्यास करुन आपल्या विषयाची स्वतंत्रपणे मांडणी केली आहे. त्यांनी केलेले हे संशोधन पूर्णपणे नवे आहे. सदर प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व ती सादर करण्यास काहीही अडथळा नाही, याची मला खात्री वाटते.

ही प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग पूर्णपणे स्वतंत्र असून यापूर्वी अन्य कोणत्याही विद्यापीठात परीक्षेसाठी सादर केलेला नाही. म्हणून ती सादर करण्यास मी अनुमती देत आहे.

स्थळ : कराड

दिनांक : 30-5-05

मार्गदर्शक

(प्रा. डॉ. रवींद्र भास्करराव पाटील)

# प्रतिज्ञापत्र

'गणेश चौधरी यांचे 'नागवा' व 'काचेचं मन' या साहित्यकृतींचे चिकित्सक अध्ययन' या विषयावरील प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. मराठी पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग पूर्णपणे स्वतंत्र असून यापूर्वी अन्य कोणत्याही विद्यापीठात परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : कराड

दिनांक : ३०।०५।०९.

अभ्यासक

(कु. रुपाली प्रकाशराव यादव)

# “विषय निवडी मागील भूमिका”

जीवन आणि साहित्य यांचा जवळचा संबंध असतो. कोणत्याही साहित्याचा केंद्रबिंदू माणूस असतो. या माणसाला केंद्रबिंदू मानूनच त्यांच्य मनाचा भाव-भावनांना सुख-दु:खाचा आविष्कार साहित्यातून केला जातो. मानसशास्त्राचाही केंद्रबिंदू माणूसच त्यामुळे परस्परांच्या मदतीने दोन्ही क्षेत्रात संशाधन होऊ लागले. त्यामुळे लेखकाचे मन आणि साहित्यकृतीगत व्यक्ती यांचा शोध घेणे त्यामुळे बरेचसे शक्य झाले आहे. मानसशास्त्राचा अभ्यास करत असताना मनावैज्ञानिक म्हणजे काय? तसेच मनोरुग्ण याविषयी जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली. पुढे एम्. फील. साठी विषय निवड करण्याआगोदर ‘गणेश चौधरी’ यांचे ‘काचेचं मन’ या पत्रात्मक आत्मकथनाचा उल्लेख डॉ. अर्चना चव्हाण मॅडम यांच्या पीएच. डी. ची प्रबंधिका ‘पत्रात्मक साहित्यकृतीचा चिकित्सक अभ्यास’ यामध्ये वाचण्यास मिळाला. पुस्तकाला दिलेले शिर्षक आणि त्यांनी केलेले विवेचन वाचून ‘गणेश चौधरीं’च्या विषयी आणखी जाणून घेण्याची ओढ निर्माण झाली. ही ओढ ‘आकांक्षा’ हे मासिक वाचल्यानंतर आणखी तिव्र झाली. यामध्ये त्यांचा व त्यांच्या साहित्याचा संपूर्ण आढावा घेतला होता. हे वाचल्यानंतर गणेश चौधरींविषयी व स्क्रिझोफेनिया म्हणजे काय? हे जाणून घेण्याची उत्सुकता वाढली. म्हणजे सामान्यपणे अन्य लेखक करतात ते त्यांच्या भाव-भावना व इच्छेखांतर, पण येथे एका मनोरुग्णाने केलेले हे लेखन व त्याचे वेगळेपण जाणून घेण्यासाठी तसेच गणेश चौधरींनी साहित्यात आणलेल्या वेगळ्या प्रवाहाचा अभ्यास करण्यासाठी ‘नागवा’ व ‘काचेचं मन’ ही दोन्ही पुस्तक अभ्यासाठी निवडली. माझे गुरु डॉ. रवींद्र पाटील सर व मराठी विभाग प्रमुख प्रा. संभाजीराव देसाई सर यांच्याशी चर्चा करुनच.

गणेश चौधरींच्या साहित्यकृतींचा अभ्यास करण्याआगोदर, त्यांना झालेल्या स्क्रिझोफेनिया म्हणजे काय? हा आजार जाणून घ्यावा असे वाटले. ‘स्क्रिझोफेनिया’ हा आजार मेंदूच्या ‘असामान्य’(ABNORMAL) रचनेमुळे होतो. गणेश चौधरींना १९६८ च्या सुमारास याची सुरुवात झाली. त्यांना अनेक भास होऊ लागले आणि हा स्क्रिझोफेनिया रोगाचा तो आरंभ होता. ते वेडे होते. गणेश चौधरींचा हा आजार वाढत गेला. झोपेविना

बैचेन रात्री जाऊ लागल्या. त्यातुन पळवाट काढण्यासाठी दारु पिवू लागले. त्यांच्या काचेच्या मनाला होणारे विकृत भास पुढेपुढे इतक्या पराकोटीला पोहचले की त्या वेडाच्या भारात त्याच्या हातून हत्येसारखे महाभयंकर कृत्य घडले. हे सर्व त्यांच्या हातून घडले. ते त्यांच्या स्क्रिझोफेनियाच्या अवस्थेत. यातून त्यांची मनोविकृती समजते. म्हणजे यालाच मानशास्त्रीय भाषेत 'व्यक्तीमत्वदुभंग', 'स्क्रिझोफेनिया' म्हणजात. हा रोग त्यांना वयाच्याा सात ते आठ वर्षे पासून त्यांना लागण झाली होती.

गणेश चौधरी 'मनोरुग्ण' असले तरी ते एक साहित्यिक होते. त्यांच्या 'तृषार्त' या काव्यसंग्रहाला 'केशवसूत पारितोषिक' ३१ मार्च १९७६ रोजी राज्यापाल यांच्या हस्ते मिळाले होते. तसेच त्यांचे 'सुर्य मध्यरात्रीचा आणि दोन एकांकिका' (१९८४), 'नागवा' (१५ ऑगस्ट १९८७), 'काचेचं मन' (१९९०), आणि 'तृषार्तनंतरची कविता' (१ जानेवारी १९९४) इ. साहित्य संपदा प्रसिद्ध आहेत. हे सर्व साहित्य त्यांना मनोरुग्णालयात असताना लेखन केले आहे. त्यांच्या 'तृषार्त' या काव्यसंग्रहाची अनेक वाचने झाी आहेत तसेच त्याला बरीशीच पारितोषिके मिळाली आहेत. त्यांचे कौतुक नभोवाणी, नियतकालिकांनी केलेचं पण चौधरींना अनेक रुग्णांना लिहिते केले.

'नागवा' हे आत्मकथन गणेश चौधरींच्या भाव-भावनांचे व त्यांच्या मानसिक अवस्थेचे प्रतिबिंब आहे. त्यांचे व्यक्तिगत जीवन अत्यंत वादळी आहे. अनेक मानसिक संघर्षाच्या ठिणग्यांनी हा माणूस होरपळून काळा पडला आहे. हे आत्मकथन त्यांनी आठवेल तसे आणि त्यांना सांगितल्या गेलेल्या आठवणींवरुन लिहिलेले आहे. ते स्वत:ला सावरण्याच्या व जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका मनोरुग्णाची कथा आहे. त्यांची होलपट ही दुदैवाने केली आहे. त्यांच्या हातून झालेल्या दृष्कृत्यामुळे त्यांची होणारा मानसिक त्रास व स्वत:चा राग भयंकर संताप, घृणा आणि अमानुष घटनेच्या आठवणी ते कोणताही आडपडदा न ठेवता सांगतात या पुस्तकातील प्रत्येक कथेतून त्यांनी त्याच्यावर त्यांनी होणाऱ्या आघाताचे आणि त्यांमुळे त्यांच्या बालमनाची होणारी परवड दिसते. प्रेमासाठी आसुसलेले एक मन दिसते. वडिलांच्या प्रतिष्ठेमुळे ते सतत दबलेले दिसतात तसेच यातून त्यांची प्रिय बहिणीचे शब्दचित्र रेखाटले आहे. आपल्या जीवनातील अनेक प्रसंग ते सांगतात. आत्मकथन लिहिण्यापाठीमागे लेखकाचा हेतू लपलेला असतो.

त्याचप्रमाणे 'नागवा' हे आत्मकथन चौधरी लिहितात. त्यापाठीमागे त्यांचा हेतू म्हणजे? आपले अनुभव दुसऱ्याला उपयोगी पडावे, त्यांना आपल्या अनुभवातून उपचारास मदत मिळावी, तसेच मनोवैज्ञानिक जर आपला मेंदू संशोधनाला देण्यास ही ते तयार असल्याचे सांगतात. 'नागवा' हे आत्मकथन म्हणजे एका विलक्षण मनोरुग्णाच्या, भाबड्या जीवाच्या सर्वकष व्यथेच्या अंतिम चरणाशी व्यक्त केलेली ही भावना वाचणीय आहे. गणेश चौधरी यांचे व्यक्तीमत्व हे विलक्षण संवेदनाक्षम आहे. त्याचप्रमाणे सतेज प्रतिभा, साधी सुबोध परंतू प्रसंगी चित्रमय व ओजस्वी बनणारी भाषा शैली आणि प्रत्ययकारक अभिव्यक्ती या दुर्मिळ गुणांची चौधरींना देणगी लाभलेली अहो. अशा गुणांची मनोरुग्णास भाववेगाची जोड मिळालेली आहे.

पत्रलेखनातील हृदयस्थ जवळीक आणि गद्यलेखनातील कमावलेली शैली त्यांची अत्यंत मनोवेधक संमिश्रपणे गणेश चौधरी यांच्या 'काचेचं मन' या पत्रात्मक आत्मकथनातून दिसतात. तसेच त्यांनी आपल्या मनाला वापरलेली 'काचेचं मन' ही उपमा अत्यंत सार्थ व समर्पक वाटते. या पुस्तकात त्यांनी आप्तस्वकियांना, मित्रांना, नातेवाईकांना लिहिलेली पत्रे आहेत. बाहेरच्या जगाशी संवाद साधन्यासाठी त्यांनी पत्र हे माध्यम निवडले होते. तसे पाहता आजच्या जगात जिथे थोरा मोठ्यांची पत्रे येतात व ती प्रकाशित होऊन ते किती मोठी आहेत. याची 'डीम डीम' मिरवली जाते. येथे गणेश चौधरी या मनोरुग्णाने लिहिलेली 'पत्रे' मात्र साहित्यांत अस्सल दस्तावेज ठरली आहेत. या पुस्तकात पत्रसंग्रहामध्ये त्यांचे 'मृत्युपत्र' तर मराठी साहित्यात अजरामर ठरले. आपल्या मानसिक व्यथेचं भयानक स्वरुप या पत्रामधून त्यांनी मांडलेलं आहे. गणेश चौधरींनी 'स्क्रिझोफेनिया'बद्दल व त्यांच्या हातून वेडाच्या स्थितीत घडून गेलेल्या आपाद्घटनेबद्दल त्यांनी ठायी ठायी अत्यंत पश्चातापदग्द अंतकरणाने कळवण्यातून स्वचिकित्सा केलेली आहे. त्याचबरोबर मनोदुभंगतेच्या आपल्या स्वत:ला न कळलेल्या ह्या आजारबद्दल भेटलेल्या प्रत्येकाला ते सांगता. या पत्रातून ते सांगतातखचत चाललेल्या व्यक्तिचा आत्मविश्वास श्वासाने तोल संभाळावा न येणे. चक्कर, भ्रम, भासांचे वाढते आवर्त, हातापायांची आग, मेंदूस मुंग्या, डोळ्यांची आग, मान झुकलेली अशा अत्यंत त्रासदायक मनोविच्छेदनात्म भयंकर त्रासाने ते कसे खचत गेले याचे वर्णन केले आहे.

'नागवा' व 'काचेचं मन' या दोन्ही कलाकृतींमधून गणेश चौधरींनी कळवळून एक गोष्ट सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ती म्हणजे आपल्याला होणारा हा त्रास अत्यंत जुना आहे. याचे जाळे त्यांच्या कोवळ्या वयापासून विणणे सुरु झाले आहे. हे सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. या सर्वांची मांडणी करण्याचा प्रयत्न मी या प्रबंधिकेत केला आहे.

# ऋणनिर्देश

'गणेश चौधरी यांचे 'नागवा' व 'काचेचं मन' या साहित्यकृतीचे चिकित्सक अध्ययन' या प्रस्तुत विषयाचा अभ्यास करीत असताना विषयाची निवड करण्यापासून ते प्रबंधिकेला पूर्णत्व देण्यापर्यंत मार्गदर्शकांनी माझ्यासाठी 'गुरुवर्या' ची भूमिका बजावली. माझे मार्गदर्शक आदरणीय प्रा. डॉ. रवींद्र भास्करराव पाटील यांनी केलेल्या मौलिक मार्गदर्शनामुळे सहकार्यामुळे व वेळावेळी प्रबंधिका पूर्ण करण्यासाठी दिलेल्या प्रेरणेमुळे हा प्रबधिका पूर्ण होवू शकली. त्यांची सदैव ऋणी रहाणे हे मी माझे सदभाग्यच समजते.

एम्. फिल्. अभ्यासक्रमाला प्रवेश घेवून तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे आदरणीय प्राचार्य डॉ. मोहन राजमाने सर (सदगुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड) मराठी विभाग प्रमुख, प्रा. संभाजीराव देसाई सर, प्रा. सौ. रैनाक मॅडम, प्रा. सौ. निकम मॅडम, प्रा. डॉ. सौ. दिवेकर मॅडम, प्रा. पाटील सर (आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर) तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष माझ्या पाठीशी असणारे सर्व गुरुवर्य या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य मला मिळाले. या सर्वांचे ऋण कधीही न फिटण्यासारखे आहेत.

सतत आशीर्वाद व प्रोत्साहन देणारे माझे वडील, श्री. प्रकाशराव जयसिंगराव यादव व आई सौ. पुष्पा प्रकाशराव यादव, तसेच माझे काका श्री. सुनिल यादव व काकी सौ. अनिता यादव व माझा दादा श्री. तुषार यादव माझ्या वहिनी सौ. स्मिता यादव व माझी बहिण सौ. दिपाली व भाऊजी श्री. सचिन सावंत, श्री. व सौ. सतिश गायकवाड यांच्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

प्रबंधिकेच्या अभ्यास करताना माझ्या मित्र,मैत्रिणींनी कु. सुचिता औंधकर, सतिश पाटील, अरविंद गाढे तसेच संपूर्ण एम्. फिल्. ग्रुप यांनीही वेळोवळी मदत केली त्यांच्या या सहकार्याबद्दल त्यांची मी आभारी आहे.

एम्. फिल्. प्रबंधिकेसाठी आवश्यक महत्त्वाची अशी संदर्भ पुस्तके मिळवून देण्यासाठी अनेकांनी सहकार्य केले. सदगुरु गाडगे महाराज कॉलेज येथील ग्रंथपाल व त्यांचे सर्व सहकारी, आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज; कडेपूर यांच्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

प्रस्तुत प्रबंधिकेची संगणकाद्वारे अक्षरजुळणी करणाऱ्या सुरज दिलीप अवसरे, (मंगलमुर्ती ॲडस्) कराड यांचेही सहकार्य मिळाले. यापुढेही या सर्वांचे असेच सहकार्य मिळावे ही आशा बाळगते व सर्वांची ऋणी राहू इच्छिते.

कु. रुपाली प्रकाशराव यादव

'कै. गणेश-चौधरी'



# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रकरण १ | चरित्रात्मक वाङ्मयाचा थोडक्यात आढावा | १ ते १४ |
| प्रकरण २ | आत्मचरित्र/आत्मकथन लेखनामागील भूमिका | १५ ते ३० |
| प्रकरण ३ | मराठी आत्मकथनांची परंपरा | ३१ ते ४६ |
| प्रकरण ४ | नवी मराठी आत्मकथने | ४७ ते ५८ |
| प्रकरण ५ | गणेश चौधरी यांचे अल्पचरित्र | ५९ ते ८६ |
| प्रकरण ६ | गणेश चौधरी यांचे 'नागवा'चे अध्ययन | ८७ ते ११० |
| प्रकरण ७ | गणेश चौधरी यांचे 'काचेचं मन' | १११ ते १५५ |
| प्रकरण ८ | निष्कर्ष | १५६ ते १७३ |
| | परिशिष्ठ | १७४ ते १७६ |
| | संदर्भ ग्रंथ | १७७ ते १८० |